असा. क्र. ३८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑक्टोबर १४, २००८/आश्विन २२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.**— महाराष्ट्र उच्च न्यायालय [खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र (लेटर्स पेटन्ट) अपिलांची पद्धती रद्द करणे] अधिनियम, १९८६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. | ३६८-३६९ |

दिनांक २५ जून २००८ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १४ ऑक्टोबर २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र उच्च न्यायालय [खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र (लेटर्स पेटन्ट) अपिलांची पद्धती रद्द करणे] अधिनियम, १९८६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९८६ चा महा. १७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) अधिनियम, १९८६ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) अधिनियम, १९८६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केलेला आहे), याच्या कलम २ मध्ये, परंतुकामधील, " व राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन " हा मजकूर वगळण्यात येईल व तो, १ जुलै १९८७ पासून वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल. १९८६ चा महा. १७.

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, " (कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेले अर्ज धरून) एखाद्या दाव्यातून किंवा इतर कार्यवाहीतून उद्‌भवेल अशा प्रकरणी " या मजकुराऐवजी, " कलम २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या अर्जातून किंवा कोणत्याही संविधीअन्वये केलेल्या अपिलातून उद्‌भवेल अशा प्रकरणी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, अशा कोणत्याही अर्जामध्ये किंवा अपीलामध्ये एक सदस्य न्यायाधीशाने, दिलेल्या न्यायनिर्णयाच्या किंवा आदेशाच्या विरोधातील कोणत्याही अपिलामध्ये १ जुलै १९८७ पासून सुरू होणाऱ्या आणि महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००८ अंमलात येण्याच्या तारखेस संपणाऱ्या कालावधीत उच्च न्यायालयाने दिलेला न्यायनिर्णय किंवा आदेश वैधरित्या दिला असल्याचे मानण्यात येईल आणि एक सदस्य न्यायाधीशाच्या अशा न्यायनिर्णयाच्या किंवा आदेशाच्या विरोधात अपील करता येण्याची कोणतीही तरतूद नव्हती या कारणावरुन कोणत्याही न्यायालयात त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही. " ; २००८ चा महा. २७.

(ग) पोट-कलम (२) मध्ये, " हा अधिनियम अंमलात येण्याच्या " या मजकुराऐवजी, " महाराष्ट्र उच्च न्यायालय (खंड न्यायपीठाद्वारे रिट अर्जांची सुनावणी व मुंबई येथील उच्च न्यायालयातील एकस्व पत्र अपिलांची पद्धती रद्द करणे) (सुधारणा) अधिनियम, २००८ अंमलात येण्याच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल. २००८ चा महा. २७.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ६२ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, ऑक्टोबर १४, २००८/आश्विन २२, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद)**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) (Amendment) Act, 2008 (Mah. XXVII of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

**MAHARASHTRA ACT No. XXVII OF 2008.**

*(First published, after having received the assent of the President, in the "Maharashtra Government Gazette", on the 14th October 2008).*

An Act further to amend the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) Act, 1986.

WHEREAS it is expedient to amend the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) Act, 1986, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :— Mah. XVII of 1986.

1. *(1)* This Act may be called the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) (Amendment) Act, 2008. Short title and commencement.



[ **किंमत** : रुपये १५.०० ]

*(2)* It shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

Amendment of section 2 of Mah. XVII of 1986.

**2.** In section 2 of the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) Act, 1986 (hereinafter referred to as " the principal Act "), in the proviso, the words " and with the previous approval of the State Government " shall be deleted and shall be deemed to have been deleted with effect from the 1st July 1987. Mah. XVII of 1986.

Amendment of section 3 of Mah. XVII of 1986.

**3.** In section 3 of the principal Act, —

(*a*) in sub-section *(1)*, for the words, brackets and figure " arising from a suit or other proceeding (including the applications referred to in section 2) instituted or commenced," the words and figure " arising from the applications referred to in section 2 or an appeal under any statute instituted or commenced," shall be substituted ;

(*b*) to sub-section *(1)*, the following proviso shall be added, namely :–

" Provided that, the judgement or orders passed by the High Court during the period commencing from the 1st July 1987 and ending on the date of commencement of the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) (Amendment) Act, 2008, in any appeal against judgement or order passed by a single Judge in any such application or appeal, shall be deemed to have been validly passed and shall not be called in question in any court on the ground that no appeal was provided against such judgement or order of a single Judge."; Mah. XXVII of 2008.

(*c*) in sub-section *(2)*, for the words " commencement of this Act " the words, brackets and figures " commencement of the Maharashtra High Court (Hearing of Writ Petitions by Division Bench and Abolition of Letters Patent Appeals) (Amendment) Act, 2008 " shall be substituted. Mah. XXVII of 2008.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई